लोकमत

# पूररेषेच्या आत 16 मजली इमारत कशी?

## दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा : पर्यावरणप्रेमी नागरिकांची आयुक्तांकडे मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून वडगाव बुद्रुक येथे मुठा नदीच्या निळ्या पूर रेषेच्या आत नदीत भराव टाकून १६ मजली इमारत उभी करण्यास परवानगी दिली आहे. त्याबाबत सातत्याने पाटबंधारे विभागाने आक्षेप घेऊनही या कामाला स्थगिती दिली नाही. त्यामुळे या बांधकामास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन करून चौकशी करा, अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरिकांनी आयुक्तांकडे केली आहे.

पाटबंधारे विभागाने मार्च २०११ मध्ये मुळा-मुठा नदीच्या निळ्या व लाल पूर रेषांचे नकाशे निश्चित केले आहेत. पूर रेषांच्या आराखड्यांना मान्यता देण्याचा अधिकार पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्यांपेक्षा कनिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांना नाही. असे असतानाही पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने फेब्रुवारी २०१८ परवानगी दिली. पण, ही चूक लक्षात आल्याने पाटबंधारे विभागाने ही परवानगी ग्राह्य धरू नये असे महापालिकेला कळविले होते. तरीही महापालिकेने बांधकामास परवानगी दिली आणि तेथे निळ्या रेषेच्या आत राडारोडा टाकून १६ मजली इमारत उभारण्यात आली आहे. त्यामध्ये १४४ सदनिका आहेत. वारजे पुलाजवळ या इमारतीचे काम सुरू आहे. यामुळे भविष्यात पूर स्थितीला सामोरे जावे लागणार असल्याचा आरोप सारंग यादवाडकर यांनी पत्रकार परिषदेत केला. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून सर्व परवानग्या दिल्या आहेत. त्यांचे निलंबन करून चौकशी करा, अशी मागणी आयुक्तांकडे केली असल्याचे विवेक वेलणकर यांनी सांगितले.

### पालिकेची चूक नाही

या इमारतीच्या बांधकामाला महापालिकेने सर्व परवानग्या पाटबंधारेच्या पूर रेषेच्या नकाशानुसारच दिल्या आहेत. त्यामध्ये आमची काही चूक नाही असा खुलासा महापालिकेने केला आहे.

**144** सदनिका

**16** मजली इमारत

या इमारतीसाठी पालिकेने परवानगी दिली आहे. पूररेषा निश्चित करण्याचे अधिकार पाटबंधारे विभागाला आहेत. ही जागा निळ्या पूररेषेच्या आत नाही, पाटबंधारे विभागाच्या पत्रांमध्ये विसंगती असल्याने संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे कनिष्ठ अभियंत्यांच्या विरोधात आम्ही तक्रार करणार आहोत.

**- प्रशांत वाघमारे, नगरअभियंता, पुणे महापालिका**

